# महाराष्ट्र शासन
## विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, कोकण विभाग, पनवेल
### शासकीय अध्यापक महाविद्यालय परिसर, पनवेल,जि.रायगड-४१० २०६.

ई-मेल पत्ता :- jdhe.pnvl-mah@gov.in Website: http://jdhepanvel.org

दूरध्वनी व फॅक्स नंबर (०२२-२७४५३८२०)

क्र.विसस/उशि/कोविप/शिष्यवृत्ती/२०१७ 2638 दि. 05/10/16

**महत्वाचे व अति तात्काळ**

**परिपत्रक**

**विषयः उच्च शिक्षण संचालनालयाच्या अखत्यारितील शिष्यवृत्ती/आर्थिक सहाय्य योजनांची राज्यशासनाच्या MahaDBT Portal द्वारे अंमलबजावणी करणे बाबत..**

संदर्भः १. मा. संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र.उशिसं/शिष्य-२०१७/डीबीटी पोर्टल/ ११२५१, दि.२०.०९.२०१७

२. उच्च व तंत्रशिक्षण विभाग, शासन निर्णय क्र.स्कॉलर-४९१७/प्र.क्र.१४६/मशि-२, दि.०२.०८.२०१७.

सन २०१७-१८ पासून संदर्भ क्र.२ चे शासन निर्णयातील परिशिष्ट - अ मध्ये नमूद असलेल्या उच्च शिक्षण संचालनालय व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण यांचेमार्फत राबविण्यात येणाऱ्या राज्यशासनाच्या शिष्यवृत्ती/ आर्थिक सहाय्य योजनांची अंमलबजावणी **MahaDBT Portal** द्वारे ऑनलाईन करण्यात येत आहे. त्या योजना खालील प्रमाणे आहेत.

| अ.क्र. | योजनांची नावे |
|---|---|
| ०१ | हिंदी मधील मॅट्रीकोत्तर अभ्यासासाठी अहिंदी भाषीक राज्यातील विद्यार्थ्यांना देण्यात येणारी शिष्यवृत्ती |
| ०२ | राज्यशासनाची खुली गुणवत्ता शिष्यवृत्ती |
| ०३ | गणित व भौतिकशास्त्र विषयातील प्रज्ञावान विद्यार्थ्यांना देण्यात येणारी शिष्यवृत्ती |
| ०४ | शासकिय विद्यानिकेतन शिष्यवृत्ती |
| ०५ | एकलव्य आर्थिक सहाय्य |
| ०६ | गुणवान विद्यार्थ्यांना आर्थिक सहाय्य (AMS) |
| ०७ | राज्यशासनाची दक्षिणा अधिछात्रवृत्ती |
| ०८ | शासकिय संशोधन अधिछात्रवृत्ती |
| ०९ | जवाहरलाल नेहरू विद्यापीठ शिष्यवृत्ती |
| १० | माजी सैनिकांच्या पाल्यांना आर्थिक सहाय्य |
| ११ | स्वातंत्र्य सैनिकांच्या पाल्यांना आर्थिक सहाय्य |

- सन २०१७-१८ पासून वरील सर्व शिष्यवृत्ती व सवलती योजनांचे नवीन मंजूरी आणि नुतनीकरणाच्या ऑनलाइन पध्दतीने अर्ज भरण्यासाठी राज्यशासनामार्फत **MahaDBT Portal** सुरू करण्यात आलेले आहे.
- सदर शिष्यवृत्ती / सवलती योजनांचे नविन मंजूरी / नुतनीकरणाचे अर्ज विद्यार्थ्यांनी www.mahadbt.gov.in या संकेतस्थळावरून ऑनलाईन पध्दतीने भरणे आवश्यक आहे.
- शिष्यवृत्ती /आर्थिक सहाय्य योजनेच्या लाभासाठी शासनाने वेळोवेळी निश्चित केलेली कार्यपध्दती, अटी, शर्ती, व निकष लागू राहतील. सदर माहीती **MahaDBT Portal** वर उपलब्ध आहे.
- नुतनीकरणाचे ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरण्यासाठी मागील वर्षाचा मंजूरी आदेश क्रमांक असणे आवश्यक आहे. त्यामुळे महाविद्यालयांनी त्यांचेकडून विद्यार्थ्यांना मंजूरी आदेश क्रमांक देण्यात यावा. गुणवान विद्यार्थ्यांना आर्थिक सहाय्य (AMS) योजनेसाठी उच्च शिक्षण संचालनालयाकडून विद्यार्थ्यांना पाठविण्यात आलेल्या प्रथम पत्राची प्रत स्कॅन करून अर्जासोबत अपलोड करणे आवश्यक आहे.

- विद्यार्थ्यांनी उपरोक्त शिष्यवृत्ती / सवलतींचे ऑफलाईन पध्दतीने अर्ज करू नयेत. तथापी यापूर्वी सन २०१७-१८ साठी ज्या महाविदयालयांनी / विद्यापीठांनी विद्यार्थ्याचे ऑफलाईन अर्ज स्विकारले असतील / ते अर्ज उच्च शिक्षण संचालनालय अथवा संबंधित विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण यांचेकडे सादर केलेले असतील त्या विद्यार्थ्यांनी ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरणे आवश्यक आहे. यासाठी महाविदयालय / विद्यापीठांनी संबंधित विद्यार्थ्यांना सूचना देऊन ऑनलाईन अर्ज भरणेबाबत कळविण्यात यावे. विद्यार्थ्याने ऑनलाईन अर्ज न भरल्यामुळे विद्यार्थी शिष्यवृत्तीपासून वंचित राहील्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित महाविद्यालयाची राहील.
- महाविद्यालय स्तरांवर अर्जाची छाननी करण्यासाठी आवश्यक असलेले प्राचार्य व लिपिक यांचे देण्यात आलेले User ID & Password यापूर्वीच दि.१६.०९.२०१७ रोजी प्रस्तूत कार्यालयाकडून महाविद्यालयांना देण्यात आले आहेत. तरीही ज्या महाविद्यालयांची नांव अथवा त्यांचे कोर्सेस MahaDBT Portal वर दिसून येत नसतील त्यांनी आपल्या महाविद्यालयाची माहिती दि.१४.०८.२०१६ च्या पत्रासोबत जोडलेल्या Excel Sheet मध्ये कोणताही बदल न करता English Font मध्येच मा. संचालनालयाच्या stat.dhepune@nic.in वर तात्काळ पाठविण्यात यावी.
- संचालनालयाच्या www.dhepune.gov.in या संकेतस्थळावर याबाबत वेळोवेळी प्रसिध्द करण्यात येणाऱ्या सूचनांचे महाविद्यालय / विद्यापीठ यांनी वेळोवेळी अवलोकन करावे.
- विद्यार्थ्यांनी ऑनलाईन भरलेले अर्ज महाविद्यालय / विद्यापीठ यांनी छाननी करून त्वरीत पुढील टप्प्यावर ऑनलाईन फॉरवर्ड करण्यात यावेत.
- विद्यार्थ्यांना अर्ज भरताना येणाऱ्या महाविद्यालय / विद्यापीठ यांना अर्जावर पुढील कार्यवाही करताना येणाऱ्या तांत्रिक समस्यासाठी MahaDBT Portal वर देण्यात आलेले टोल फ्री क्रमांक व ई-मेल आय.डी यावर संपर्क साधावा.
- तसेच सर्व अधिनस्त महाविद्यालये / शैक्षणिक संस्था यांचे प्राचार्य / विभागप्रमुख यांनी त्यांच्या महाविद्यालयांतील सर्व पात्र विद्यार्थ्यांना सदर MahaDBT Portal वरील योजनांचा जास्तीत जास्त लाभ मिळावा यासाठी सदर MahaDBT Portal बाबतचा **सर्व तपशील तसेच पोस्टर आपल्या महाविद्यालयाच्या दर्शनीय सूचना फलकावर लावून** सदर योजनेबाबतची माहिती सर्व विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणून द्यावी. तसेच प्रस्तूत कार्यालयाकडून आयोजित केलेल्या कार्यशाळेमध्ये दिलेल्या सूचनांनुसार विद्यार्थ्यांना अर्ज भरण्यासाठीही मदत करावी.

RBhosle
5/10/17

विभागीय सहसंचालक,
उच्च शिक्षण, कोकण विभाग, पनवेल.

प्रति,

१. प्राचार्य/संस्था प्रमुख, सर्व अधिनस्त अशासकीय अनुदानित व विना अनुदानित, कायम विना-अनुदानित कला, वाणिज्य, विज्ञान, विधी व अध्यापक महाविद्यालये, जि.ठाणे, पालघर,रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग.
२. कुलसचिव / कुलगुरु, मुंबई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई
३. कुलसचिव / कुलगुरु, एस.एन.डी.टी.महिला विद्यापीठ चर्चगेट, मुंबई

प्रतः मा. संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे-४११ ००१ यांना माहितीस्तव सादर.